मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महाराजांनी औरंगजेबाला तहात २३ किल्ले दिले

## ठाकरे-पवारांनी ४० आमदार दिले: संजय राऊत

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

महाराष्ट्र, मराठी अस्मिता आणि लोकशाही टिकवायची असेल तर संघर्षासाठी तयार रहा. यासाठी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी उभे रहा, असे वक्तव्य ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केले. ते सोमवारी पिंपरी चिंचवडमध्ये गजानन बाबर यांच्या जीवनावर आधारित पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात बोलत होते. या कार्यक्रमाला शरद पवार, श्रीनिवास पाटील आणि अमोल कोल्हेदेखील उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या व्यासपीठावरुन बोलताना संजय राऊत यांनी देवेंद्र फडणवीस आणि महायुतीला लक्ष्य केले. त्यांनी म्हटले की, पुरंदरच्या तहाचा इतिहास सांगितला गेला. युद्धात जिंकतो अन तहात हरतो, असं सांगितलं जातं. पण असं आता होणार नाही.



छत्रपती शिवाजी महाराजांनी २३ किल्ले दिले ना? ठाकरेंनी ४० आणि पवार साहेबांनी ४० आमदार दिले. ज्याला ते किल्ले दिले त्या औरंगजेबला इथेच गाडलं गेलं. शाहिस्तेखानाची बोटे आणि अफजलखानाचा कोथळा महाराष्ट्रात काढला गेला. आता ४० अधिक ४० आणि काँग्रेसचा एक असे ८१ आणि एकूण १८१ किल्ले आपण परत जिंकू, असा विश्वास संजय राऊत यांनी व्यक्त केला. शरद पवार साहेब आत्ता सभागृहात जे सुरुये, ती विजयाची तुतारी आहे. देवेंद्र फडणवीस काल साताऱ्यात गेले त्यावेळी छत्रपती उदयनराजेंच्या राजवाड्यात गेले. त्यावेळी पन्नास तुताऱ्यांनी त्यांचं स्वागत केलं, हे पाहून फडणवीस गांगरून गेले. त्यांना काय करावं हेच कळेना. त्यामुळं तुतारी आणि मशाल हे चिन्ह मिळणं शुभसंकेत आहेत, असे संजय राऊत यांनी म्हटले.विलास लांडे म्हणाले त्यांचा एक कारखाना आहे, त्यात तीन हजार लोक काम करतात. हे वाक्य ऐकलं आणि माझ्या डोक्यावरचं ओझं हलकं झालं.

कारण आता निवडणूक आली, खासदार कोल्हे काम चांगलं करतात मात्र त्यांच्याकडे पैसा नाही. त्यामुळं उद्या लोकसभेच्या निवडणुकीत त्यांच्यासाठी एक पाठीराखा पाहिजे, असा मी विचार करत होतो. आता विलासराव इतका जबरदस्त आणि शक्तिशाली पाठीराखा दुसरा कोणी नाही. तुम्ही तुमच्या कंपनीचा आणि तीन हजार कामगारांचा उल्लेख केल्यानं मला स्पष्ट झाल्याचे शरद पवार यांनी म्हटले.या कार्यक्रमाच्या व्यासपीठावरुन बोलताना संजय राऊत यांनी देवेंद्र फडणवीस आणि महायुतीला लक्ष्य केले. त्यांनी म्हटले की, पुरंदरच्या तहाचा इतिहास सांगितला गेला. युद्धात जिंकतो अन तहात हरतो, असं सांगितलं जातं. पण असं आता होणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी २३ किल्ले दिले ना? ठाकरेंनी ४० आणि पवार साहेबांनी ४० आमदार दिले. ज्याला ते किल्ले दिले त्या औरंगजेबला इथेच गाडलं गेलं. शाहिस्तेखानाची बोटे आणि अफजलखानाचा कोथळा महाराष्ट्रात काढला गेला. आता ४० अधिक ४० आणि काँग्रेसचा एक असे ८१ आणि एकूण १८१ किल्ले आपण परत जिंकू, असा विश्वास संजय राऊत यांनी व्यक्त केला.

### यांची होती उपस्थिती

» युद्धात जिंकतो अन तहात हरतो, असं सांगितलं जातं. पण असं आता होणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी २३ किल्ले दिले ना? ठाकरेंनी ४० आणि पवार साहेबांनी ४० आमदार दिले. ज्याला ते किल्ले दिले त्या औरंगजेबला इथेच गाडलं गेलं. शाहिस्तेखानाची बोटे आणि अफजलखानाचा कोथळा महाराष्ट्रात काढला गेला. आता ४० अधिक ४० आणि काँग्रेसचा एक असे ८१ आणि एकूण १८१ किल्ले आपण परत जिंकू, असा विश्वास संजय राऊत यांनी व्यक्त केला. शरद पवार साहेब आत्ता सभागृहात जे सुरुये, ती विजयाची तुतारी आहे. देवेंद्र फडणवीस काल साताऱ्यात गेले त्यावेळी छत्रपती उदयनराजेंच्या राजवाड्यात गेले. त्यावेळी पन्नास तुताऱ्यांनी त्यांचं स्वागत केलं, हे पाहून फडणवीस गांगरून गेले. त्यांना काय करावं हेच कळेना. त्यामुळं तुतारी आणि मशाल हे चिन्ह मिळणं शुभसंकेत आहेत, असे संजय राऊत यांनी म्हटले.विलास लांडे म्हणाले त्यांचा एक कारखाना आहे, त्यात तीन हजार लोक काम करतात. हे वाक्य ऐकलं आणि माझ्या डोक्यावरचं ओझं हलकं झालं. कारण आता निवडणूक आली, खासदार कोल्हे काम चांगलं करतात मात्र त्यांच्याकडे पैसा नाही. त्यामुळं उद्या लोकसभेच्या निवडणुकीत त्यांच्यासाठी एक पाठीराखा पाहिजे, असा मी विचार करत होतो. आता विलासराव इतका जबरदस्त आणि शक्तिशाली पाठीराखा दुसरा कोणी नाही.

# अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक अत्याचार करून हत्या

## अपघाताचा बनाव करणाऱ्या नराधमाचे बिंग वाकड पोलिसांनी फोडले

**। पिंपरी-चिंचवड।**

पिंपरी चिंचवडमध्ये अल्पवयीन मुलाचे आधी अपहरण मग अनैसर्गिक कृत्य करून त्याची हत्या करण्यात आल्याचा धोकादायक प्रकार समोर आला आहे. सुरुवातीला अपघातात झाल्याचा बनाव नराधमाने केला होता. मात्र वाकड पोलिसांनी तपास करत या प्रकरणाचं बिंग फोडलं आहे.मिळालेल्या माहितीनुसार नराधम आरोपी पवन पांडे याला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. नराधमाने वाकड हद्दीतून आठ वर्षीय मुलाचे शनिवार (दि.२४) रोजी रात्री अपहरण केले होते. नराधम पांडे हा रसवंती गृहात तीनचं दिवसांपूर्वी कामाला आला होता. त्याच ठिकाणी पीडित खेळत असायचा, हे पाहून नराधमाने त्याला एकदा ऊसाचे रस दिले. असं करून मुलाशी जवळीक साधली आणि शनिवारच्या रात्री साडे आठच्या सुमारास त्याचं अपहरण केले. आरोपी त्यामुलाला वाकड येथून पाषाण तलावालगत घेऊन गेला. रात्रीच्या काळोखात त्याच्यावर अनैसर्गिक अत्याचार केले. त्यानंतर गळा दाबून त्याची हत्या केली. तोपर्यंत पीडित मुलाच्या कुटुंबियांकडून त्याची शोधाशोध सुरू झाली. अखेर रात्री दहा वाजता पीडिताच्या कुटुंबीयांनी पोलीस स्टेशन गाठले. दुसरीकडे रात्री अकराच्या सुमारास रसवंती गृहाच्या मालकाने पांडेला फोन करून गायब मुलाला पाहिलं होतं का? अशी विचारणा केली. मात्र मला त्याबाबत कल्पना नसल्याचं तो म्हणाला. पण पोलिसांनी तपासाची चक्र फिरवली. परिसरातील सीसीटीव्ही तपासले, त्यात पांडे मुलाला खुणावत असल्याचं अन मुलगा त्याच्या पाठीमागे चालत निघाल्याचं अन् पुढं जाऊन दोघे अचानकपणे गायब झाल्याचं दिसून आले. सकाळी वाकड पोलिसांनी बावधन गाठलं आणि पांडे राहत असलेल्या घरात जाऊन त्याला ताब्यात घेतले. सुरुवातीचे तीन तास त्याने तोंडचं उघडले नाही, मग पोलिसी खाक्या दाखवताच तो बोलू लागला. माझ्या कडून अपघात झाला अन त्यात त्याचा मृत्यू झाला. त्याच्या कुटुंबियांना काय उत्तर देणार, म्हणून मी मृतदेह पाषाणमध्येच फेकल्याचं स्पष्टीकरण त्याने दिलं. या नराधमाने निष्पाप मुलावर अनैसर्गिक अत्याचार करून त्याची हत्या केल्याचं उघड झालं.

# चिंचवड, लोणावळा रेल्वे स्टेशनचा होणार कायापालट

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन भूमीपूजन

**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या पाठपुराव्याने रेल्वे स्टेशनचा कायापालट केला जात आहे. आकुर्डी, तळेगाव दाभाडे या स्टेशनच्या विस्तारानंतर आता अमृत भारत रेल्वे स्टेशन योजना दोन अंतर्गत चिंचवड,देहूरोड, लोणावळा रेल्वे स्टेशनच्या विस्तारीकरणाच्या कामाचे भूमीपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज (सोमवारी) ऑनलाइन माध्यमातून झाले आहे. तसेच शेलारवाडी,जांभूळ, कामशेत या ठिकाणी बांधलेल्या अंडरपास पुलाचे उद्घाटन व पोल क्र.४७ मळवली स्टेशन जवळ अंडरपासच्या कामाचे भूमिपूजनही झाले. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव ऑनलाइन सहभागी झाले होते. तर, खासदार श्रीरंग बारणे हे चिंचवड, देहूरोड रेल्वे स्टेशन येथे उपस्थित होते. देशातील रेल्वे स्टेशनचा कायापालट करण्याचा




मनोदय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आहे. रेल्वे स्टेशनचा विकास करण्यासाठी केंद्र सरकारने अमृत भारत स्टेशन ही योजना हाती घेतली आहे. या योजनेत मावळ मधील रेल्वे स्टेशनचा समावेश करण्यासाठी खासदार बारणे यांनी सातत्याने केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला. रेल्वे स्टेशनचे विस्तारीकरण, सुशोभीकरण व्हावे, प्रवाशांना चांगल्या सोयी-सुविधा मिळाव्यात यासाठी खासदार बारणे हे गेल्या अनेक दिवसांपासून प्रयत्न करत होते. त्यांच्या पाठपुराव्यानुसार मावळ लोकसभा मतदारसंघातील चिंचवड, आकुर्डी, देहूरोड, तळेगाव दाभाडे या चार स्टेशनचा योजनेत समावेश झाला होता. त्यातील पहिल्या टप्प्यातील आकुर्डी आणि तळेगाव दाभाडे या स्टेशनच्या विस्तारीकरण, सुशोभीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. आता अमृत भारत योजना दोन अंतर्गत चिंचवड, देहूरोड, लोणावळा रेल्वे स्टेशन नूतनीकरण व सुधारचे काम हाती घेतले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन कामाचे भूमीपूजन झाले. तसेच शेलारवाडी,जांभूळ व कामशेत या ठिकाणी बांधलेल्या अंडरपास पुलाचे उद्घाटन व पोल क्र.४७ मळवली स्टेशन जवळ अंडरपास या कामाचे भूमिपूजन देखील पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते झाले. रेल्वे स्थानकावर फुटओव्हर ब्रीज, प्रतीक्षा रुम, स्वच्छतागृह, विद्युत व्यवस्था, सिग्नल, दिव्यांगासाठी सोयी-सुविधा, पर्यावरणपूरक वातारण, आवश्यकतेनुसार लिफ्ट, मोफत वाय-फाय, साफसफाई, अत्याधुनिक सूचना प्रणाली, वाहनतळासाठी जागा, शेड उपलब्ध करुन दिले जाणार असून रेल्वे स्टेशनचा कायापालट होणार आहे. मावळ लोकसभा मतदारसंघातील रेल्वे स्टेशनचा विस्तार केला जात आहे. प्रवाशांना विविध सुविधा दिल्या जात आहेत. रेल्वे स्टेशनचे आधुनिकीकरण केले जात आहे. पनवेल रेल्वे स्टेशनचा नव्याने विकास आराखडा (डीपीआर) होत आहे. ट्रॅक वाढविले जात आहे. लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा दिला जात आहे. या विभागातील रेल्वेचा कायापालट करण्याचे काम खासदार श्रीरंग बारणे यांच्या माध्यमातून होत आहे.लोणावळा रेल्वे स्टेशनच्या विस्तारीकरणाच्या कामाचे भूमीपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज (सोमवारी) ऑनलाइन माध्यमातून झाले आहे.

### संसदरत्न पुरस्कार सोहळा संपन्न

**» या योजनेत मावळ मधील रेल्वे स्टेशनचा समावेश करण्यासाठी खासदार बारणे यांनी सातत्याने केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला. रेल्वे स्टेशनचे विस्तारीकरण, सुशोभीकरण व्हावे, प्रवाशांना चांगल्या सोयी-सुविधा मिळाव्यात यासाठी खासदार बारणे हे गेल्या अनेक दिवसांपासून प्रयत्न करत होते. त्यांच्या पाठपुराव्यानुसार मावळ लोकसभा मतदारसंघातील चिंचवड, आकुर्डी, देहूरोड, तळेगाव दाभाडे या चार स्टेशनचा योजनेत समावेश झाला होता. त्यातील पहिल्या टप्प्यातील आकुर्डी आणि तळेगाव दाभाडे या स्टेशनच्या विस्तारीकरण, सुशोभीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. आता अमृत भारत योजना दोन अंतर्गत चिंचवड, देहूरोड, लोणावळा रेल्वे स्टेशन नूतनीकरण व सुधारचे काम हाती घेतले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन कामाचे भूमीपूजन झाले. तसेच शेलारवाडी,जांभूळ व कामशेत या ठिकाणी बांधलेल्या अंडरपास पुलाचे उद्घाटन व पोल क्र.४७ मळवली स्टेशन जवळ अंडरपास या कामाचे भूमिपूजन देखील पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते झाले.**

# बाबर यांच्या जीवनचरित्रावर आधारित 'संघर्षयात्री'

## पुस्तकाचे शरद पवार, संजय राऊत यांच्या हस्ते प्रकाशन

**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मावळ लोकसभेचे प्रथम खासदार दिवंगत गजानन बाबर यांच्या संघर्षमय जीवनावर आधारित 'संघर्षयात्री' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ नेते शरद पवार आणि खासदार संजय राऊत यांच्या हस्ते आज सोमवार (दि.२६) सायंकाळी साडेपाच वाजता चिंचवड येथे संपन्न होणार आहे. चिंचवडच्या प्रा. रामकृष्ण




मोरे नाट्यगृहात होणाऱ्या या समारंभासाठी खासदार श्रीनिवास पाटील, अरविंद सावंत, डॉ. अमोल कोल्हे, आमदार सचिन आहिर, माजी आमदार विलास लांडे, मदन भोसले, महादेव बाबर, माजी महापौर आझम पानसरे, संजोग वाघेरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. 'किकली ते दिल्ली, व्हाया पिंपरी-चिंचवड' असा खडतर प्रवास करत जवळपास ४५ वर्षांची राजकीय कारकीर्द गजानन बाबर यांनी यशस्वीपणे पूर्ण केली. शिवसेनेच्या माध्यमातून बाबर यांनी पिंपरी महापालिकेचे तीन वेळा नगरसेवक म्हणून प्रतिनिधीत्व केले. या कालावधीत ते महापालिकेतील विरोधी पक्ष नेतेही होते. हवेली विधानसभा मतदारसंघातून ते सलग दोन वेळा आमदारपदी निवडून आले. मावळ लोकसभेची निर्मिती झाल्यानंतर मावळचे पहिले खासदार म्हणून गजानन बाबर यांची नोंद झाली. सातारा येथील भुईंजच्या किसनवीर सहकारी साखर कारखान्याचे संचालक तसेच उपाध्यक्ष म्हणून बाबर यांनी जवळपास १५ वर्षे समर्थपणे जबाबदारी पार पाडली. सातारा असो की पुणे, पिंपरी-चिंचवड, या संपूर्ण प्रवासात बाबर यांनी लोकहितासाठी व नागरी प्रश्नांसाठी शेकडो आंदोलने केली.

# संसदेमध्ये नवरा जाणार की मी?

## सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांच्यावर जोरदार टीका

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** माझ्या नवऱ्याने भाषणे ठोकलेली तुम्हाला चालतील का? संसदेमध्ये नवरा जाणार की मी जाणार? असा प्रश्न विचारत खासदार सुप्रिया सुळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार टीका केली. त्याचवेळी नवऱ्याला संसदेच्या परिसरात परवानगी नसते. कॅन्टीनमध्ये बसावे लागते. तुम्हाला कसा खासदार पाहिजे, असा प्रश्नही त्यांनी केला. अजित पवार बारामती लोकसभा मतदारसंघात जाऊन सुप्रिया सुळे यांना पराभूत करण्याचे अप्रत्यक्ष आवाहन करत आहेत. प्रत्येक आठवड्यात ते एकदातरी बारामती मतदारसंघात सभा घेत आहेत. हाच धागा पकडून सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांना



लक्ष्य केले. त्याचबरोबर विरोधकही सुप्रिया सुळे यांच्या इमानदारीचे कौतुक करतात, असे सुळे यांनी आवर्जून सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर पक्ष आणि चिन्ह अजित पवार गटाकडे गेल्यानंतर विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांचा बारामती लोकसभा मतदारसंघातील विजय रथ रोखण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कंबर कसली आहे. सत्तेत असलेल्या अजित पवार यांना शह देण्यासाठी आता खुद्द शरद पवार यांनी लक्ष घातले असून, रविवारी (३ मार्च) त्यांनी पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे. सुप्रिया सुळे गेली १५ वर्षे बारामती मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. २००९ साली त्या भाजपच्या कांता नलावडे यांच्या विरोधात सहज विजयी झाल्या. २०१४ साली देशभरात मोदी लाट असताना आणि भाजपने राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांच्या मागे ताकद उभी केली असतानाही सुळे यांनी बालेकिल्ला राखला. लोकसभा २०१९ ला पुन्हा मोदींचा देशभर करिश्मा असताना आणि अमित शहा यांनी बारामतीत सभा घेतल्यानंतरही सुळे या सुमारे दीड लाखांहून अधिक मतांनी विजयी झाल्या.

त्यात अजित पवार यांनी आखलेली रणनीती महत्त्वाची होती. आता राष्ट्रवादीतील फुटीनंतर सर्व समीकरणे बदलली आहेत. खुद्द अजित पवार हे भगिनी सुप्रिया यांच्या पराभवासाठी रणनीती आखत आहेत. त्यासाठी ते पत्नी सुनेत्रा यांनाच निवडणूक रिंगणात उतरवणार हे आता स्पष्ट झाले आहे.या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनीही बारामती लोकसभा मतदारसंघाची निवडणूक गांभीर्याने घेतली आहे. लेकीसाठी पवार रिंगणात उतरले असून त्याचाच एक भाग म्हणून पवार यांनी रविवारी (३ मार्च) पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे. इंदापूरच्या सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या विचारांचा खासदार द्या, असे आवाहन केले. तर सुनेत्रा पवार यांनी तुम्ही समजून घ्यायचे ते घ्या, असे म्हणत उमेदवारीचे स्पष्ट संकेत दिले. त्यांनी इंदापूर पाठोपाठ दौंड आणि पुरंदरमध्येही भेटीगाठीचा सिलसिला कायम ठेवला आहे. त्यामुळे मतदारसंघात प्रचाराने वेग घेतला आहे.

### पवार यांच्यावर जोरदार टीका

» इंदापूरमध्ये विद्यमान आमदार दत्तात्रय भरणे हे राष्ट्रवादीचे असून माजी मंत्री हर्षवर्धन पाटील भाजपमध्ये कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांनाही आपोआपच महायुतीचे काम करावे लागणार आहे. गेल्या निवडणुकीत आमदार राहुल कुल यांच्या पत्नी कांचन यांनी सुप्रिया सुळे यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती. कुल हे भाजपचे आमदार आहेत. माजी आमदार रमेश थोरात हे अजित पवार यांचे कट्टर समर्थक आहेत. भाजपचे जिल्हाध्यक्ष वासुदेव काळे दौंडमधील आहेत. या सगळ्यांना स्थानिक मतभेद विसरून आता सुनेत्रा पवार या उमेदवार असतील तर त्यांचाच प्रचार करावा लागेल. सध्या सुनेत्रा पवार यांनी येथे भेटीगाठी सुरु केल्या आहेत.माझ्या नवऱ्याने भाषणे ठोकलेली तुम्हाला चालतील का?

# महारोजगार मेळावा २ व ३ मार्च दोन दिवस होणार

## महारोजगार मेळाव्याचे २ मार्च रोजी बारामती येथे करण्यात आले आयोजन

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यांतील युवक-युवतींना रोजगार मिळवून देणाऱ्या विभागस्तरीय 'नमो महारोजगार मेळाव्या'सह इतर कार्यक्रमांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह जिल्ह्यातील मंत्रीमहोदयांच्या प्रमुख उपस्थितीत २ मार्च रोजी बारामती येथे आयोजन करण्यात आले आहे.महारोजगार मेळाव्यातून तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगार, स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी, कार्यक्रमांचे काटेकोर नियोजन करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत आज दिले. बारामती येथे होणाऱ्या विभागास्तरीय नमो महारोजगार मेळाव्यासंदर्भात आढावा बैठक झाली. बैठकीस कौशल्य, रोजगार, उद्योजकता, नाविन्यता विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय,



राज्य नाविन्यता व कौशल्य विकास सोसायटीच्या आयुक्त निधी चौधरी, पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, मुख्यमंत्री कार्यालयाचे विशेष कार्यकारी अधिकारी बाळसिंग राजपूत, रोजगार आयुक्तालयाचे उपायुक्त डी. डी. पवार, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल सोनवणे, कौशल्य विकास मंत्र्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी दिलीप हिरवाळे उपस्थित होते. सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, पुण्याचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, विविध जिल्ह्यांचे व विभागांचे क्षेत्रीय अधिकारी, बारामती येथील स्थानिक अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.उपमुख्यमंत्री अजित पवार बैठकीत मार्गदर्शन करताना म्हणाले की, बारामतीत २मार्चला नमो महारोजगार मेळाव्याबरोबरच बऱ्हाणपूर येथील पोलीस उपमुख्यालयाचे उद्घाटन, पोलिसांसाठीच्या घरांचे लोकार्पण, पोलीस विभागाला देण्यात येणाऱ्या दुचाकी व चारचाकी वाहनांचे लोकार्पण, सीसीटीव्ही प्रकल्पाचा प्रारंभ, अतिरिक्त पोलीस अधीक्षक कार्यालयाचे उद्घाटन, बारामती बसस्थानकाचे लोकार्पण आदी कार्यक्रम होणार आहेत. स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचे वढू बुद्रुक आणि तुळापूर येथील स्मारक, आद्यक्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकाच्या ठिकाणीही कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे.

# जरांगेंना बदनाम करणारे राणेंचे कार्यकर्ते

## जरांगेंच्या विरोधात बोलण्यासाठी फोन येत आसल्याची वकिलांची माहिती

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

'मनोज जरांगे पाटील यांची दिवसेंदिवस वाढत चाललेली लोकप्रियता काही लोकांना सहन होईना, त्यामुळेच पाटील यांच्यावर बिनबुडाचे आरोप केले जात आहेत. जरांगे यांनी समाजासाठी मोठा त्याग केला असुन त्या माणसाचे योगदान विसरता येणार नाही. सत्ताधारी पक्षातील राजकीय मंडळी काही लोकांना हाताशी धरून पाटील यांची बदनामी करत आहेत.बीड शहरात चार तरुणांनी पत्रकार परिषद घेऊन जरांगे यांच्यावर खोटे आरोप केले. केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या कुटुंबातील सदस्यांचे ते कार्यकर्ते असुन सोशल मीडीयावर देखील त्यांचे फोटो दिसून येतील.' अशी माहिती जरांगे यांच्या शिवबा संघटनेतील बकील ॲड. वाजीद खान बीडकर व ॲड. गणेश मस्के पाटील यांनी दिली. कोपर्डी प्रकरणातील आरोपींना कोर्टात मारहाण केलेल्या तरूणांनी पत्रकार परिषद घेऊन जरांगे यांनी काही मदत न केल्याचे आरोप केले होते, या आरोपावरून जरांगे यांच्या शिवबा संघटनेतील वकीलांनी आज पुण्यात पत्रकार परिषद घेऊन आरोपांचे खंडन केले. ॲड. मस्के पुढे बोलताना म्हणाले, '२०१७ मध्ये कोपर्डी येथे एका मुलीवर आत्याचार झाला त्या आरोपींना कोर्टाच्या बाहेर मारण्यासाठी जरांगे जाणार होते, परंतु इतर सदस्यांनी जावू दिले नाही. मात्र या चार तरूणांनी जास्त बळजबरी केली आणि त्यानी आरोपींना कोर्टाच्या बाहेर मारहाण केली. या तरूणांना जोपर्यंत जामीन मिळाला नाही तोपर्यंत जरांगे घरी गेले नाहीत.याच तरुणांनी तीन महिन्यापूर्वी पत्रकार परिषद घेऊन जरांगे यांचे कौतुक केले होते आणि आता अचानक भूमिका बदलली. काही लोकांचे मन दुखावले की तो लगेच जरांगे यांच्या विरोधात बोलतो. जरांगे यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष किंवा शरद पवार यांच्याशी काही सबंध नाहीत. जरांगे यांच्या विरोधात ज्या तरुणांनी पत्रकार परिषद घेतली त्यांना झेल मधून बाहेर काढण्यासाठी आम्ही व जरांगे यांनी दिवसरात्र कष्ट घेतले. जरांगे यांच्या विरोधात बोलण्यासाठी आम्हाला अनेक फोन येत असून वेळ आल्यावर पुराव्यासह ते बाहेर काढू.'केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या कुटुंबातील सदस्यांचे ते कार्यकर्ते असुन सोशल मीडीयावर देखील त्यांचे फोटो दिसून येतील.' अशी माहिती जरांगे यांच्या शिवबा संघटनेतील बकील ॲड. वाजीद खान बीडकर व ॲड. गणेश मस्के पाटील यांनी दिली. कोपर्डी प्रकरणातील आरोपींना कोर्टात मारहाण केलेल्या तरूणांनी पत्रकार परिषद घेऊन जरांगे यांनी काही मदत न केल्याचे आरोप केले होते, या आरोपावरून जरांगे यांच्या शिवबा संघटनेतील वकीलांनी आज पुण्यात पत्रकार परिषद घेऊन आरोपांचे खंडन केले.



### जरांगे यांच्यावर खोटे आरोप

» ॲड. मस्के पुढे बोलताना म्हणाले, '२०१७ मध्ये कोपर्डी येथे एका मुलीवर आत्याचार झाला त्या आरोपींना कोर्टाच्या बाहेर मारण्यासाठी जरांगे जाणार होते, परंतु इतर सदस्यांनी जावू दिले नाही. मात्र या चार तरूणांनी जास्त बळजबरी केली आणि त्यानी आरोपींना कोर्टाच्या बाहेर मारहाण केली. 'मनोज जरांगे पाटील यांची दिवसेंदिवस वाढत चाललेली लोकप्रियता काही लोकांना सहन होईना, त्यामुळेच पाटील यांच्यावर बिनबुडाचे आरोप केले जात आहेत. जरांगे यांनी समाजासाठी मोठा त्याग केला असुन त्या माणसाचे योगदान विसरता येणार नाही. सत्ताधारी पक्षातील राजकीय मंडळी काही लोकांना हाताशी धरून पाटील यांची बदनामी करत आहेत.बीड शहरात चार तरुणांनी पत्रकार परिषद घेऊन जरांगे यांच्यावर खोटे आरोप केले.

# तरुणींच्या व्हिडीओने 'पिट्याभाई' अडचणीत येणार?

## व्हिडीओ व्हायरल केल्याप्रकरणीमहिला आयोगाकडे तक्रार

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुण्यातील वेताळ टेकडीवर कथित अमली पदार्थाच्या नशेत असलेल्या मुलींचा व्हिडीओ व्हायरल केल्याप्रकरणी अभिनेता रमेश परदेशी अडचणीत येण्याची शक्यता आहे. नशेत असलेल्या मुलींचा व्हिडीओ व्हायरल करताना त्याने मुलींचा चेहरा ब्लर केला नाही. त्यामुळे त्याच्याविरोधात महिला आयोगाकडे तक्रार करण्यात आली.

विशेष म्हणजे या व्हिडीओत रमेश परदेशी यांनी या व्हिडीओत या तरुणी अंमली पदार्थाच्या आहारी गेल्याचा दावा केला होता. मात्र, तक्रारदार नेहा पुरव यांनी पोलिसांच्या हवाल्याने या तरुणी अमली पदार्थाच्या आहारी नसल्याचे स्पष्ट केले. रविवारी, अभिनेते रमेश परदेशी यांनी वेताळ टेकडीवरील व्हिडीओ आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर पोस्ट केला होता. या व्हिडीओत दोन तरुणी नशेच्या आहारी गेल्याचे दिसत होते. एक मुलगी बेशुद्ध अवस्थेत आहे तर दुसऱ्या मुलीने अंमली पदार्थ घेतल्याने नशेत बडबड करत असल्याचा दावा करण्यात आला. हा व्हिडीओ पोस्ट करत रमेश परदेशी यांनी म्हटले की, वेताळ टेकडीवर आम्ही मॉर्निंग वॉकला आलो होतो. तर इथं महाविद्यालयात पहिल्या वर्षाला शिकणाऱ्या या दोन तरुणी बियर, दारु आणि नशेचं काहीतरी घेऊन टेकडीच्या कोपऱ्यात पडल्या होत्या. या तरुणींना आम्ही इथं सेफ जागी घेऊन आलो. हे यासाठी सांगतोय कारण पुण्यात दोन दिवसांपूर्वी ४ हजार कोटींचं ड्रग्ज सापडलं आहे. मुंबईतील पत्रकार नेहा पुरव यांनी व्हायरल झालेल्या व्हिडीओवर संताप व्यक्त केला. नेहा पुरव यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, पुण्यात दोन मुली नशेच्या अमलाखाली कथित संस्कृती रक्षकांना आढळून आल्या. सगळ्यात आधी त्या मुलींनी जे केले ते अत्यंत चूकच आहे. त्या बद्दल त्यांना माफ करताच येणार नाही. पण या मुलींचे वय आणि त्यांची पुढील करिअर, पुढील आयुष्य बघता हा व्हीडिओ व्हायरल करणे कितपत योग्य होते? त्यांचे चेहरे न दाखवता स्वतःच्या समाजसेवेचा डांगोरा पिटता आला नसता का? असा सवाल त्यांनी केला. नेहा पुरव यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, मी या प्रकारानंतर पुण्याच्या कोथरूड पोलीस स्टेशन मधुन पत्रकार म्हणून माहिती घेतली. तेव्हा या मुली बिअर प्यायला होत्या आणि पोटात अन्न नसल्याने त्यांना नशा आल्याचे पोलिसानी सांगितले. या मुलींनी ड्रग्ज घेतले नव्हते, अशी माहिती पुरव यांनी दिली.

